महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम
अतिरिक्त जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन
करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
गृह विभाग.
शासन निर्णय क्रमांक-तंमुगा-१००८/सीआर-२०/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक - १४ मे, २००८. GMG1050802

**वाचा-१) शासन निर्णय क्रमांक- एमआयएस-१००७/सीआर-२३८/पोल-८, दि.१९ जुलै, २००७.**
**२) शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.एमआयएस-१००७/सीआर-२३८/पोल-१५, दि.२६ मार्च, ०८**
**३) शासन निर्णय क्र.तंमुगा-१००८/सीआर-२०/पोल-१५, दि.११ एप्रिल, २००८.**

**शासन निर्णय-** दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये राज्यात महात्मा गांधी तंटा मुक्त गाव मोहीम सुरु करण्यात आली असून सदर शासन निर्णयातील तरतुदींनुसार गाव तंटामुक्त करण्याचे निकष पूर्ण केल्यानंतर तंटामुक्त गाव समितीने दिनांक १ मे रोजी ग्रामसभेत गाव तंटामुक्त झाल्याचे जाहीर करावयाचे होते. त्याप्रमाणे स्वयंमूल्यमापनानुसार ज्या गावांनी ग्रामसभा घेऊन गाव तंटामुक्त झाल्याचे जाहीर केले आहे त्यांची संख्या मोठी आहे. स्वयंमूल्यमापनात ज्या गावांनी तंटामुक्त गाव म्हणून घोषित केले आहे त्या सर्व गावांचे जिल्हांतर्गत मूल्यमापन समितीकडून मूल्यमापन करणे आवश्यक असून जिल्हांतर्गत मूल्यमापनात निकष पूर्ण करणाऱ्या गावांचे मूल्यमापन जिल्हाबाह्य समितीकडून करण्यात येणार आहे.

२. उपरोक्त दिनांक १९ जुलै, २००७ च्या शासन निर्णयात जिल्हा मूल्यमापन समितीची रचना विहित केली असून प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र जिल्हा मूल्यमापन समिती नेमण्याची सूचना करण्यात आली आहे. सदर समिती पाच सदस्यांची असून त्यामध्ये महसूल अधिकारी, पोलीस अधिकारी, विधी अधिकारी/ विधी सल्लागार, एका पंचायत समितीचे सभापती व जिल्हा पत्रकार संघाने शिफारस केलेल्या एका प्रतिनिधीचा समावेश आहे. महसूल अधिकारी समितीचे अध्यक्ष राहतील. त्याचप्रमाणे दिनांक ११ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयान्वये असे सूचित केले आहे की, सर्वसाधारणपणे प्रत्येक तालुक्यासाठी एक मूल्यमापन समिती स्थापन करण्यात येईल. तथापि, जिल्ह्यातील तंटामुक्त गावांची संख्या विचारात घेऊन जास्त जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करता येतील. तालुक्यातील घोषित गावांची संख्या विचारात घेऊन एका जिल्हा मूल्यमापन समितीला एका पेक्षा अधिक तालुक्यातील गावांच्या मूल्यमापनाचे काम देता येईल. तसेच एखाद्या तालुक्यात घोषित गावांची संख्या जास्त असेल तर एकापेक्षा अधिक समित्या अशा तालुक्यासाठी नेमता येतील.

वरील बाब विचारात घेऊन शासन पुढीलप्रमाणे सूचना विहित करीत आहे:-

ज्या जिल्ह्यामध्ये स्वयंमूल्यमापनात तंटामुक्त गावांची संख्या अधिक आहे अशा जिल्ह्याची महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची जिल्हास्तरीय कार्यकारी समिती आवश्यकतेनुसार अतिरिक्त जिल्हा मूल्यमापन समित्या स्थापन करील. या समितीत पंचायत समितीचे सभापती व विधी अधिकारी यांचा समावेश असल्याने अतिरिक्त समित्यात पंचायत समिती व्यतिरिक्त जिल्हा परिषदेच्या अन्य सभापतींचा व सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांची जिल्ह्यातील कार्यरत संख्या कमी असेल तर त्यांचे जागी विधी व न्याय विभागाने नियुक्त केलेल्या सरकारी वकीलांच्या पॅनलमधील वकीलांचा आवश्यकतेनुरुप समावेश करील.

मात्र संबंधित सभापती व सरकारी वकीलांच्या पॅनेलवरील वकील हे ज्या तालुक्यातील आहेत, त्या तालुक्याव्यतिरिक्त अन्य तालुक्यासाठी असलेल्या समितीत त्यांचा समावेश करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २००८०५१४१२४६३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा।आ।गुट्टे

(मा.आ. गुट्टे)

अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन,

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्यातील सर्व लोकसभा/ राज्यसभा सदस्य,
सर्व मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य,
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागाचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व उपविभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील यांना पोहोचविण्याची व्यवस्था करावी),
सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (पोलीस अधीक्षक यांचेमार्फत),
(यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या प्रती आपल्या नियंत्रणाखालील प्रत्येक पोलीस ठाणे, प्रत्येक तंटामुक्त गाव समिती, प्रत्येक ग्रामपंचायत यांना पोहोचविण्याची व्यवस्था करावी),
सर्व गटविकास अधिकारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांचेमार्फत)
सर्व तहसिलदार (जिल्हाधिकारी यांचेमार्फत),
निवड नस्ती- पोल-१५.